अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. ०८/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ २२३१ दि. २८/०६/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०८/२०१९

डॉ. वैशाली जाधव
बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप.
स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड,
ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

डॉ. वैशाली जाधव रा. बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप, स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड, ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग,पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ०९.०५.२०१९ रोजी अर्ज करून "डॉ. अंजली साबणे, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी या पुणे मनपा सेवेत रुजू झाल्यापासून ते आजतागायत त्यांच्याविरुद्ध आलेल्या तक्रारी व त्याबाबत केलेल्या चौकशी ची कागदपत्रे व त्या बाबतचा अहवाल यांची सविस्तर माहिती मिळणे बाबत" अर्ज केलेला होता

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१२५९ दि. २४.०५.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे. तसेच अर्जात विचारलेली काही माहिती आरोग्य कार्यालयाशी संबंधित असल्याने जा. क्र. जमाअ/आस्था/मा.अधि./१००० दि. १६.०५.२०१९ ने आरोग्य खात्याकडे अर्ज वर्ग केलेला आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०९.०५.२०१९ | ०९.०५.२०१९ | ०७.०६.२०१९ | २४.०५.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी "माहिती नाकारण्यात आल्यामुळे" असे नमूद करून अपील क्र. ०८/२०१९ चा अपील अर्ज दि. ०४.०६.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०४.०६.२०१९ | ०४.०६.२०१९ | २२.०६.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. २०.०६.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी डॉ. वैशाली जाधव रा. बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप, स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड, ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ या उपस्थित होत्या. श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी डॉ. वैशाली जाधव रा. बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप, स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड, ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ यांनी त्यांना माहिती मिळाली नाही असे प्रतिपादन केले. तर श्री चेतन कबाडे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१२५९ दि. २४.०५.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी डॉ. वैशाली जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५अन्वये माहिती प्राप्त करण्यासाठी दि. ०९.०५.२०१९ रोजीच्या अर्जातील माहितीचा तपशील या सदराखाली डॉ. अंजली साबणे यांच्या विरुद्ध प्राप्त तक्रारी व त्यानुषंगाने केलेली कारवाई/अहवाल याबाबची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा व जन माहिती अधिकारी आरोग्य विभाग, पुणे मनपा यांनी संबंधितांस १५ दिवसात विनामोबदला उपलब्ध करून द्यावी. प्रथम अपील क्रमांक ०८/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका